रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १९ ◆ अंक ६४
www.ramprahar.com
◆ रविवार, २० सप्टेंबर २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

गौरी-गणपतींना भावपूर्ण निरोप/३
रविप्रहरमध्ये विविध विषयांवरील लेख/४
गणेशोत्सव दर्शन छायाचित्रे/६, ८

## शेतकऱ्यांना सर्वतोपरी मदत करणार -मुख्यमंत्री



**नागपूर** : राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. पावसाचा खंड पडल्यामुळे मोठ्या प्रमाणात पिके खराब होत आहेत. अनेक ठिकाणी उतारा कमी येईल अशी परिस्थिती तयार झाली आहे. या सगळ्या गोष्टींचा आढावा घेण्याचा आमचा प्रयत्न आहे. मंत्रिमंडळ बैठकीत सर्वच मंत्र्यांनी यावर चर्चा करून आपापल्या जिल्ह्यांत मूल्यमापन करण्याबाबत आदेश देण्यात आले आहेत. साधारणपणे पुढील आठवड्यात आम्ही प्राथमिक आढावा घेऊ. त्यानंतर पंचनामे करू आणि तातडीची मदतही आम्ही करू, असे आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. पत्रकारांशी बोलताना मुख्यमंत्री म्हणाले की, कर्जमाफीचे काम सुरू आहे. याबाबत तीन याद्या तयार करण्यात आल्या आहेत. उर्वरित याद्या वेगाने पूर्ण कराव्यात, असे आदेश दिले आहेत. शेतकऱ्यांना सरकारच्या वतीने सर्वतोपरी मदत केली जाईल.








अलिबाग : गौरी-गणपतींना शनिवारी पारंपरिक मिरवणुकीने निरोप देण्यात आला. यावेळी वाडगाव येथे शेतालगतच्या वाटेवरून विसर्जनासाठी गणपती डोक्यावर घेऊन जाणारे ग्रामस्थ आणि इतर भाविकांची सुधीर नाझरे यांनी टिपलेली छबी.

# विकासकामांना गती द्या!

## मुख्यमंत्री फडणवीस यांचे अधिकाऱ्यांना निर्देश

**नागपूर : प्रतिनिधी**

नागपूर शहरात 'अमृत २' अंतर्गत सुरू असलेली सर्व कामे मार्च २०२७पर्यंत गतीने आणि गुणवत्तापूर्ण पद्धतीने पूर्ण करण्याचे कडक निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. कामात कुचराई करणाऱ्या अधिकारी आणि कंत्राटदारांवर सक्त कारवाई करण्याची ताकीदही त्यांनी यावेळी दिली. शहरात 'अमृत २' योजनेअंतर्गत सुरू असलेली विकासकामे आणि पोहरा नदीचे प्रदूषण निर्मूलन व पुनरुज्जीवन या महत्त्वाच्या विषयांवर रामगिरी शासकीय निवासस्थानी आयोजित आढावा बैठकीत मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते.



यावेळी आमदार प्रवीण दटके, स्थायी समिती सभापती शिवाणी दाणी-वखरे, महापालिका आयुक्त डॉ. विपीन इटनकर, अतिरिक्त आयुक्त अंकित, मुख्यमंत्र्यांचे ओएसडी आशा पठाण, सार्वजनिक बांधकाम विभागाचे मुख्य अभियंता संभाजी माने, कार्यकारी अभियंता नीता ठाकरे, महापालिकेच्या मुख्य अभियंता लीना उपाध्ये, नगरसेवक तसेच वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.बैठकीदरम्यान 'अमृत २' योजनेअंतर्गत शहरात सुरू असलेल्या रस्ते खोदकाम व त्यानंतरच्या पुनर्भरण कामांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. उपस्थित नगरसेवकांनी त्यांच्या प्रभागातील खोदकाम आणि निकृष्ट पुनर्भरणाच्या कामाबाबत तक्रारी मांडल्या. रिंग रोडवरील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कामाबाबतही मुद्दे उपस्थित करण्यात आले.

आमदार प्रवीण दटके यांनी रस्ते खोदकामामुळे नागरिकांना होत असलेल्या त्रासाबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली, तर स्थायी समिती सभापती शिवाणी दाणी-वखरे यांनी पावसाळ्यात नागरिकांना झालेल्या गैरसोयीबाबत माहिती दिली.यावर मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट निर्देश दिले की, सिमेंट रस्त्यांवर पुनर्भरण किंवा खड्डे बुजविण्याचे काम करताना कोणत्याही प्रकारची तडजोड खपवून घेतली जाणार नाही. शास्त्रीय व वैज्ञानिक पद्धतीचा सक्तीने अवलंब करावा लागेल. भविष्यात शहरात होणारे रस्ते खोदकाम आणि त्यानंतरची पुनर्भरण प्रक्रिया यासाठी सर्व संबंधित विभागांची संयुक्त बैठक घेऊन एक सर्वसमावेशक धोरण तयार करावे. तसेच सर्व विभागांनी योग्य समन्वयाने काम करावे, असेही त्यांनी सांगितले.

बैठकीत मनपा आयुक्त डॉ. इटनकर यांनी संगणकीय सादरीकरणाद्वारे 'अमृत २' योजनेच्या कामांसोबतच पोहरा नदी प्रदूषण निर्मूलन व पुनरुज्जीवन प्रकल्पाची सविस्तर माहिती दिली. शहरातील सांडपाणी व्यवस्थापनासाठी जयताळा येथे १० एमएलडी आणि चिखली येथे ३५ एमएलडी क्षमतेचा सिव्हरेज ट्रीटमेंट प्लांट (एसटीपी) उभारण्यात येणार आहे. तसेच चिंचभवन, बीडीपेठ, सोमलवाडा येथे पंपिंग स्टेशन उभारण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली. पोहरा नदी पुनरुज्जीवनामुळे शहराच्या पर्यावरणात मोठी सुधारणा होणार असल्याचा विश्वासही व्यक्त करण्यात आला.

## पंतप्रधान मोदींच्या वाढदिवसानिमित्त एक दिवा आशीर्वादासाठी उपक्रम

**नवी मुंबई : बातमीदार**

भाजप नवी मुंबई जिल्हाध्यक्ष डॉ. राजेश पाटील यांच्या माध्यमातून तसेच नवी मुंबई जिल्ह्याच्या वतीने भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त केंद्र व राज्य सरकारच्या विविध लोककल्याणकारी योजनांच्या जनजागृतीसाठी 'एक दिवा आशीर्वादासाठी' उपक्रमांतर्गत बेलापूर मेट्रो रेल्वे स्थानकाबाहेर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.



कार्यक्रमाची सुरुवात नवी मुंबई भाजप जिल्हाध्यक्ष डॉ. राजेश पाटील यांच्या हस्ते दिवा प्रज्वलित करून करण्यात आली. यावेळी नगरसेविका सुरेखा नरबागे, समाजसेवक अशोक नरबागे, मंडळ अध्यक्ष अजय सिंह, प्रभारी जयवंत तांडेल, कोकण विभागीय कार्यालयीन प्रमुख अभिजित पेडणेकर, मंडळ अध्यक्ष कुणाल महाडिक, मनेष बिजलानी, गोपाळराव गायकवाड, विष्णू भिरूड, दीपक जोशी, अनिल अग्निहोत्री, दीपक पंजवानी, दीपेश पाटील, भूषण कोळी, सर्व भाजप सीबीडी बेलापूर मंडळाचे कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी डॉ. राजेश पाटील यांनी सांगितले की, आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा ७६वा वाढदिवस. त्यानिमित्त सेवा संकल्प अभियान व 'एक दिवा आशीर्वादासाठी' हे उपक्रम राबवत आहोत. हा केवळ एक जन्मदिन नसून समर्पणाचा दिवस आहे. सर्व नवी मुंबईकरांच्या वतीने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना दीर्घायुष्य लाभो, अशा शुभेच्छा त्यांनी यावेळी व्यक्त केल्या.

## महिलेच्या गळ्यातील मंगळसूत्राची चोरी

**पनवेल : वार्ताहर**

साईनगर परिसरातील गोविंद ग्रीनफिल्ड सोसायटीजवळ पायी घरी जात असलेल्या महिलेच्या गळ्यातील ४९ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मंगळसूत्र दुचाकीवरून आलेल्या दोन अनोळखी व्यक्तींनी जबरदस्तीने हिसकावून नेल्याची घटना घडली. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात दोघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार फिर्यादी उज्ज्वला मुकुंद पाटील (४३, रा. साईसिद्धी रेसिडेन्सी, साईनगर, पनवेल) या त्यांची मुलगी सिद्धीसोबत साईनगर परिसरातून पायी घरी जात होत्या. त्या गोविंद ग्रीनफिल्ड सोसायटीजवळ आल्या असता काळ्या रंगाच्या दुचाकीवरून आलेल्या दोन अनोळखी व्यक्तींनी त्यांच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र जबरदस्तीने खेचून घेतले. घटनेनंतर आरोपी दुचाकीवरून पसार झाले. हिसकावून नेलेल्या मंगळसूत्राची किंमत चार लाख ९० हजार असल्याचे पोलीस नोंदीत नमूद करण्यात आले आहे.

## पंतप्रधान मोदींच्या वाढदिवसानिमित्त कामोठ्यात अनोखा दीपोत्सव

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा वाढदिवस व त्यानिमित्ताने भारतीय जनता पार्टी, कामोठे शहर व नवसंकल्प प्रतिष्ठान गणेशोत्सव मंडळ यांच्या वतीने मोदींना उत्तम, निरोगी व आनंददायी आयुष्य लाभण्यासाठी श्री गणरायाच्या चरणी मनोभावे प्रार्थना, विधीवत पूजा व सामुदायिक आरती करून शुभेच्छा देण्यात आल्या.

यावेळी उपस्थित मंडळींच्या वतीने १५० दिवे प्रज्वलित करण्यात आले. यावेळी पनवेल महानगरपालिका व प्रभाग समिती "क" सभापती रवींद्र जोशी, अनुसूचित जाती मोर्चा अध्यक्ष मयूर मोहिते, नगरसेविका हेमलता गोवारी, शिलाताई भगत, प्रभाग क्रमांक १३चे अध्यक्ष भाऊ भगत, समाजसेवक रवी गोवारी, भाजप चिटणीस कामोठे शहर विनोद खेडकर, नवसंकल्प प्रतिष्ठानचे अध्यक्ष व सेक्टर १८चे प्रमुख सुरेंद्र हल्लीकर, प्रतिष्ठानच्या महिला अध्यक्षा हल्लीकर ताई, समाजसेविका नीलम मोहिते, बुथ अध्यक्ष सुरेखा लांडे, सचिन वाक्षे, समाजसेवक उत्तम जाधव, अनुसूचित जाती मोर्चाचे पदाधिकारी व महिला भगिनी, प्रतिष्ठानचे पदाधिकारी तसेच उपस्थित ज्येष्ठ श्रेष्ठ वयोवृद्ध, बालगोपाल व स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## खोपोली-खालापुरात गौरी गणपतीला भावपूर्ण निरोप



**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोली-खालापूर परिसरात गेल्या सहा दिवसांपासून भक्तिमय वातावरणात सुरू असलेल्या गौरी-गणपती उत्सवाची शनिवारी सांगता झाली. घरगुती तसेच सार्वजनिक गणपतींच्या विसर्जन मिरवणुका मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात काढण्यात आल्या. 'गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या'च्या जयघोषात भाविकांनी बाप्पाला भावपूर्ण निरोप दिला.

खोपोली शहरासह खालापूर तालुक्यातील हजारो घरगुती गणपतींचे विसर्जन विविध कृत्रिम विसर्जन तलाव तसेच विसर्जन घाटांवर करण्यात आले. ढोल-ताशांचा खणखणाट, पारंपरिक वाद्ये, भक्तिगीते आणि उत्साहवर्धक संगीताच्या तालावर निघालेल्या मिरवणुकांमुळे संपूर्ण परिसरात उत्साहाचे वातावरण होते. घरगुती गौरी-गणपतींचे विसर्जन सायंकाळी आठ वाजेपर्यंत पूर्ण झाले, तर खोपोलीसह विविध गावांतील सार्वजनिक गणपतींच्या विसर्जन मिरवणुका रात्री दहा वाजेपर्यंत सुरू होत्या.

खोपोली नगरपालिकेच्या वतीने प्रथेप्रमाणे यंदाही गणपती विसर्जन मिरवणुकांचे स्वागत करण्यात आले. यावेळी नगराध्यक्ष कुलदीपक शेंडे, उपनगराध्यक्ष विक्रम साबळे, माजी नगराध्यक्ष दत्ताजी मसुरकर, मुख्याधिकारी डॉ. पंकज पाटील, पोलीस निरीक्षक सचिन हिरे व अन्य अधिकारी, विविध पक्षांचे गटनेते, नगरसेवक-नगरसेविका, अधिकारी तसेच शहरातील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते. खोपोलीतील हायको कॉर्नर येथून निघालेल्या विसर्जन मिरवणुका बाजारपेठेतून शंकर मंदिर तलावाच्या विसर्जन घाटाकडे एकामागोमाग जात होत्या.

मिरवणुकीदरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये तसेच कायदा-सुव्यवस्था आबाधित राहावी यासाठी खोपोली पोलिसांकडून कडक बंदोबस्त ठेवण्यात आला होता. खालापूर तालुक्यातही पारंपरिक पद्धतीने गावागावांतून भाविक एकत्र येत गणपती बाप्पाला डोक्यावर घेऊन मिरवणुका काढण्यात आल्या. ढोल-ताशांच्या गजरात आणि 'गणपती बाप्पा मोरया'च्या जयघोषात गौरी व गणपतींचे विसर्जन उत्साहात पार पडले. यंदाही भाविकांची गैरसोय होऊ नये यासाठी विविध ठिकाणी कृत्रिम विसर्जन तलाव व विसर्जन घाटांची व्यवस्था करण्यात आली होती.

पान १ वरुन

## आमदार प्रशांत ठाकूर यांनी घेतले पनवेल परिसरातील गणरायांचे दर्शन

सार्वजनिक मंडळांप्रमाणेच घराघरांत भक्तिभावाने साजऱ्या होणाऱ्या गणेशोत्सवाची परंपराही आपली सामाजिक व सांस्कृतिक समृद्धी अधोरेखित करणारी असल्याचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी यावेळी सांगितले. विविध गणेशोत्सव मंडळांच्या भेटीदरम्यान मंडळांचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच भाविकांनी त्यांचे स्वागत केले. मंडळांनी आयोजित केलेल्या विविध धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमांची माहिती त्यांनी जाणून घेतली.

घरगुती गणपतींच्या दर्शनादरम्यान कुटुंबीयांनीही आमदार प्रशांत ठाकूर यांचे स्वागत केले. यावेळी त्यांनी गणरायाची आरती करून सुख, समृद्धी, आरोग्य आणि आनंदासाठी प्रार्थना केली. गणेशोत्सव भक्तिभाव, उत्साह, सामाजिक बांधिलकी आणि सलोख्याने साजरा व्हावा तसेच या उत्सवाच्या माध्यमातून समाजातील एकोपा अधिक दृढ व्हावा, अशी भावना व्यक्त करीत आमदार प्रशांत ठाकूर यांनी सर्व गणेशभक्तांना शुभेच्छा दिल्या.

## नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर लोकसंस्कृतीचे दर्शन

**नवी मुंबई : बातमीदार**

आंतरराष्ट्रीय विमानतळावर गणेशोत्सवानिमित्त महाराष्ट्राच्या समृद्ध लोकसंस्कृतीचे अनोखे दर्शन पाहायला मिळत आहे. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर विमानतळावर भव्य शोभायात्रेला सुरुवात झाली. या शोभायात्रेमध्ये ध्वज पथक, लेझीम पथक, अब्दागिरी आणि ढोल-ताशा पथकाचा उत्साह पाहायला मिळाला. शोभायात्रेत एअरलाइन्सचे कर्मचारीही पारंपरिक वेशभूषेत



सहभागी झाले. ढोल-ताशांच्या गजरात आणि लेझीमच्या तालावर संपूर्ण विमानतळ परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. महाराष्ट्राची लोककला, परंपरा आणि संस्कृतीचा जागर करत नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर गणेशोत्सवाचा उत्साह मोठ्या दिमाखात साजरा केला जात आहे. गणरायाच्या आगमनाच्या निमित्ताने विमानतळावर अनुभवायला मिळणारे हे महाराष्ट्राच्या संस्कृतीचे अनोखे रूप सध्या सर्वांचे लक्ष वेधून घेत आहे.

## वाटाणा खरेदीच्या वादातून एपीएमसीत व्यापाऱ्याला मारहाण

**नवी मुंबई : बातमीदार**

एपीएमसी आवारातील व्यापाऱ्याला दोन ग्राहकांनी मारहाण केल्याची घटना समोर आली आहे. वाटाणा खरेदीसाठी आलेल्या दोन ग्राहकांचा व्यापाऱ्यासोबत वाद झाला. या वादात त्यांनी व्यापाऱ्याला मारहाण केल्याप्रकरणी एपीएमसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

एपीएमसीमधील ३५ वर्षीय व्यापाऱ्याकडे गुरुवारी दोन ग्राहकांनी वाटाण्याबाबत चौकशी केली. त्यांच्यात वाटाण्यावरून व्यवहाराची बोलणी सुरू असतानाच वाद झाला. या वादात दोन व्यक्तींनी व्यापाऱ्याला मारहाण केली. याबाबत व्यापाऱ्याने पोलिसांकडे केलेल्या तक्रारीवरून दोघांवरही गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राइड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com

रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १९ ◆ अंक ६४
www.ramprahar.com

◆ रविवार, २० सप्टेंबर २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

# पुढच्या वर्षी लवकर या...!

## गौरी-गणपतींना भावपूर्ण निरोप

**अलिबाग : प्रतिनिधी**

लाडक्या गणेशाची पाच दिवस मनोभावे पूजाअर्चा केल्यानंतर रायगडकरांनी शनिवारी (दि.१९) त्याला भावपूर्ण निरोप दिला. गणपतींसोबत गौरींचेही 'पुढच्या वर्षी लवकर या'च्या गजरात विसर्जन करण्यात आले.



शनिवारी सायंकाळी ४ वाजल्यानंतर ठिकठिकाणी गणेश विसर्जन मिरवणुका विसर्जनस्थळी निघाल्या. ढोल ताशांच्या गजरात निघालेल्या या मिरवणुकांमध्ये गुलालाची उधळण होत होती. दक्षिण रायगडातील महाड, श्रीवर्धन, माणगाव, म्हसळा, मुरूड, रोहे तालुक्यांमध्ये मिरवणुकांमध्ये पारंपरिक सनई, खालूबाजा आणि त्यावर लेझीम घेऊन नाचणारे गणेशभक्त पाहायला मिळत होते, तर काही गणेशभक्तांनी टाळ-मृदंगाच्या साथीने भजन करीत मिरवणूक काढली. रात्री उशिरापर्यंत मिरवणुका सुरू होत्या. महिलाही मोठ्या संख्येने या मिरवणुकांमध्ये सहभागी झाल्या होत्या, फेर धरून नाचत होत्या.

आपल्या लाडक्या गणरायाला निरोप देण्यासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. विसर्जनस्थळी होणाऱ्या सामूहिक आरत्यांनी परिसर दुमदुमून गेला होता. बाप्पाला निरोप देताना वातावरण भारावून गेल्याचे दिसून आले. ग्रामीण भागात तळे, नदी, ओढे यामध्ये, तर शहरी भागात समुद्र, तलावांमध्ये गणेशमूर्तींचे विसर्जन करण्यात आले.

जिल्ह्यात ५८ हजार ८७ घरगुती, तर ८५ सार्वजनिक गणपतींसह १६ हजार १७५ गौरींचे विसर्जन करण्यात आले. विसर्जन काळात कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलिसांनी कडेकोट बंदोबस्त ठेवला होता.

# आमदार प्रशांत ठाकूर यांनी घेतले पनवेल परिसरातील गणरायांचे दर्शन



(अधिक छायाचित्रे पान ६ वर..)

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

गणेशोत्सवाच्या मंगलमय पर्वानिमित्त भाजपचे महाराष्ट्र प्रदेश चिटणीस आमदार प्रशांत ठाकूर यांनी पनवेल विधानसभा मतदारसंघातील विविध भागांना भेटी देत सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांसह नागरिकांच्या घरगुती गणरायाचे दर्शन घेतले. यावेळी त्यांनी सर्वांना गणेशोत्सवाच्या शुभेच्छा दिल्या.

पनवेल, नवीन पनवेल, कामोठे, खारघर, कळंबोली, खांदा कॉलनी तसेच ग्रामीण भागातील विविध सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना भेटी देतानाच अनेक कुटुंबांच्या घरी विराजमान झालेल्या बाप्पांचेही आमदार प्रशांत ठाकूर यांनी भक्तिभावाने दर्शन घेतले. यावेळी त्यांच्या समवेत पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

गणेशोत्सव हा भक्ती, श्रद्धा, आनंद आणि सामाजिक एकोप्याचा उत्सव आहे. या उत्सवाच्या निमित्ताने नागरिकांशी प्रत्यक्ष संवाद साधत त्यांच्या आनंदात सहभागी होण्याची संधी मिळते. **(पान २ वर..)**

# आदित्य ठाकरे यांना मानहानीच्या दाव्याची नोटीस

**मुंबई** : दिशा सालियन मृत्यू प्रकरणाला आता गंभीर कायदेशीर वळण मिळाले आहे. दिशाचे वडील सतीश सालियन यांनी शनिवारी (दि.१९) ठाकरे गटाचे नेते आमदार आदित्य ठाकरे यांना ५०० कोटी रुपयांच्या मानहानी दाव्याची नोटीस बजावली.

नोटीस देण्यासाठी सतीश सालियन स्वतः ठाकरे यांच्या 'मातोश्री' बंगल्यावर पोहचले होते. तिथे शिवसैनिकांनी गर्दी केली होती. यावेळी दिशाच्या वडिलांनी 'मातोश्री'वर जाऊन नोटीस देण्याचा निर्णय आपण केवळ धमकी दिली गेल्यामुळेच घेतल्याचे सांगितले. दरम्यान, कलानगरच्या प्रवेशद्वारावर आदित्य ठाकरेंच्या वकिलांनी नोटीस स्वीकारली.










# अलबेला @ ७५ वर्षे

## भोली सुरत दिल के खोटे....

झूम प्रहर



दिलीप ठाकूर
चित्रपट समीक्षक

काही चित्रपट चित्रपटगृहातून उतरतात, काळ पुढे सरकत राहतो, बराच पुढे सरकतो. चित्रपट रसिकांच्या किमान तीन चार पिढ्या ओलांडल्या जातात. तरी ते चित्रपट आपलं अस्तित्व दाखवत राहतात आणि त्यात एक महत्त्वाचा फंडा असतो, त्यातील गीत संगीत नृत्याची बहारदार फोडणी.

अलबेला चित्रपट असाच भन्नाट आणि भारी. मा. भगवानदादा अभिनित, निर्मित आणि दिग्दर्शित हा चित्रपट ९ सप्टेंबर १९५१ रोजी प्रदर्शित झाला. मुंबईत हा चित्रपट दक्षिण मुंबईतील डॉ. भडकमकर मार्गावरील इंपिरियल चित्रपटगृह, मध्य मुंबईतील प्रभादेवी येथील किस्मत चित्रपटगृह इतरत्र प्रदर्शित झाला. त्याच्या प्रदर्शनास पंचाहत्तर वर्षे पूर्ण झाली तरी या चित्रपटातील गाणी आजही लोकप्रिय आहेत. या गाण्यांनी ग्रामोफोन, लाऊड स्पीकर, रेडिओ असं करत करत दूरचित्रवाणी, उपग्रह वाहिनी, मोबाईल रिंगटोन, यू ट्यूब असा बराच मोठा प्रवास केला आहे. आजच्या ग्लोबल युगातील डिजिटल पिढीलाही नाचावे असं वाटावं असं या चित्रपटाचं गाण्याचा ठेका आहे. या चित्रपटातील मूळ गाण्याचे रिमिक्स आजच्या जेन झी आणि जेन अल्फा पिढीलाही ताल धरायला लावतील.


राजेंद्र कृष्ण यांनी लिहिलेल्या गीतांना सी. रामचंद्र यांचे संगीत आहे. भोली सुरत दिल के खोटे नाम बडे और दर्शन छोटे (पार्श्वगायन लता मंगेशकर आणि अण्णा चितळकर अर्थात सी रामचंद्र), शोला जो भडके दिल मेरा धडके ( लता मंगेशकर आणि अण्णा चितळकर अर्थात सी. रामचंद्र), धीरेसे आजा रे अखियन मे (लता मंगेशकर), शाम ढले खिडकी तले (लता मंगेशकर आणि अण्णा चितळकर), बलमा बडा नादान रे (लता मंगेशकर), दीवाना आ गया (लता मंगेशकर आणि मोहम्मद रफी), तेरी याद ने मारा ( लता मंगेशकर आणि अण्णा चितळकर), किस्मत की हवा कभी गरम कभी नरम (अण्णा चितळकर) ही या चित्रपटातील गाणी अफाट लोकप्रिय झाली. यातील शोला जो भडके दिल मेरा धडके, ये दीवाना ये परवाना ही गाणी क्लब अथवा कॅब्रे शैलीतील आहेत असे जणू प्रमाणपत्र या गाण्यांना दिले गेले. या गाण्यात संगीतकार सी. रामचंद्र यांनी बोगाडूम, ओबो, क्लैरिनेट, तुरही, सेक्साफोन या वाद्यांचा भरभरून वापर केला गेला. सहज ताल धरायला लावतील अशी ही गाणी लहान मोठ्या पार्ट्या, वाढदिवसाचा सोहळा यात झालेच पण गोकुळाष्टमीतील गोविंदा आला रे आलाची धूम, श्रीगणेश विसर्जन मिरवणूक यातील कच्चीबाजावर ही गाणी हमखास वाजवणार. ताशा असो, ढोल असो, कोंबडी बाजा असो असं करत करत डीजेचे युग आले तरीही त्यात भोली सुरत दिल के खोटे, शाम ढले खिडकी तले ही गाणी हमखास वाजवणार आणि त्यावर मागची आणि आजची पिढी तल्लीन होऊन बेभान नाचणारच.

आपल्या देशातील चित्रपट संस्कृतीतील सर्वात जास्त महत्त्वाची गोष्ट, त्याचे गीत संगीत नृत्य आणि तोच जर कथेचा भाग असेल अथवा गाण्याच्या माध्यमातून पटकथा पुढे सरकत असेल तर रसिक त्यात गुंतून, गुरफटून जाणारच. जुन्या काळातील चित्रपटांची ती मोठीच ताकद आणि ओळख.

'अलबेला' निमिर्तीच्या मागची एक बॅक स्टोरी सांगितली जाते. भगवानदादा आपल्या विशिष्ट शैलीत नायक रंगवत असताना त्यांनी गुनहगार (१९३९) या चित्रपटापासून चित्रपट दिग्दर्शनात पाऊल टाकले. त्या काळानुसार त्यांनी मसाला मिक्स चित्रपट निर्माण केले. त्यात एक साधीशी कथा, गीत संगीत नृत्य, ढिश्यूम ढिश्यूम गोष्ट, केवढे तरी योगायोग असं सगळं जमवून आणत. बदला (१९४३), बहादूर प्रताप (१९४५), मतवाले (१९४७), भेंडी बंगला (१९४८), भोले भाले (१९५०) अशी त्यांची नायक आणि दिग्दर्शक अशी वाटचाल सुरू झाली. मध्यम बजेटचे चित्रपट ही त्यांची खासियत. या चित्रपटाना स्टंटपट असं म्हणत आणि मुंबईत हे चित्रपट दक्षिण मध्य मुंबईतील ग्रॅण्ड रोड परिसरातील ताज, निशात, ऑल्फ्रेड, न्यू रोशन अशा चित्रपटगृहात प्रदर्शित होत, मुंबईत इतरत्र, तसेच अन्य शहरांमध्येही या चित्रपटाना बी अथवा सी दर्जाच्या चित्रपटगृहात जागा मिळे. तात्पर्य, या चित्रपटाना मुख्य प्रवाहात स्थान मिळत नव्हते. एका फिल्मी पार्टीत शोमन राज कपूर आणि भगवानदादा यांची भेट झाली. राज कपूरचे आपलं एक व्यक्तिमत्व आणि साम्राज्य असले तरी भगवानदादाचीही आपल्या खासियत होती. राज कपूरने या भेटीत भगवानदादा यांना सांगितले, मुख्य प्रवाहातील चित्रपटगृहात प्रदर्शित होईल असा चित्रपट बनवा. किती काळ तुम्ही छोट्या छोट्या चित्रपटाच्या जगात वावरणार? भगवानदादानी राज कपूरचा 'मोलाचा सल्ला' ऐकला. नायिका म्हणून गीता बालीला करारबद्ध केले आणि दोघांनीही मनसोक्त मनमुराद नृत्य करत 'अलबेला'मधील गाण्यात मनोरंजनाचा रंग भरला. हा फिल्मी किस्सा प्रसिद्ध आहे.









'अलबेला'च्या गाण्याची ध्वनिमुद्रिका प्रकाशित होताच त्यातील गाणी रेडिओ, लाऊड स्पीकर, इराणी हॉटेलमधील ज्यूक बॉक्स, वाद्यवृंद अशी सगळीकडे ऐकू येत गेली आणि मग ९ सप्टेंबर १९५१ रोजी मुंबईतील इंपिरियल चित्रपटगृह आणि इतरत्र हा चित्रपट प्रदर्शित झाला..., पण चित्रपट रसिकांकडून या चित्रपटाचे चक्क थंड स्वागत झाले. भगवानदादाना हा सांस्कृतिक धक्काच होता. त्या काळातील काही फिल्मवाले चित्रपटगृहाला भेट देऊन आपल्या चित्रपटाला कसा प्रतिसाद मिळतोय हे अतिशय उत्सुकतेने जाणून घेत. पहिल्या आठवड्यात फारसं यश प्राप्त झाले नाही. दुसरा आठवडाही जेमतेम बरा गेला. चित्रपट सुरू होताच भगवानदादा इंपिरियल चित्रपटगृहाच्या मुख्य हॉलबाहेर येवून आतल्या पब्लिक रिस्पॉन्सचा कानोसा घेत. आणि.... तिसऱ्या आठवड्यापासून पिक्चर क्लिक झालं, पडद्यावर गाणे सुरू होताच पब्लिकही ताल धरे, शिट्ट्या वाजत, भोली सुरत दिल के खोटे पडद्यावर सुरू होताच काही पब्लिक पडद्यावर चिल्लर पैसे उडवत, काहीजण पडद्यासमोर नाचत आणि पिक्चर असं काही सुपर डुपर हिट ठरले की इंपिरियल चित्रपटगृहात पंचवीस आठवड्याचा मुक्काम केला. भगवानदादा स्टार झाले.पहिला डान्सर हिरो अशी त्यांची प्रतिमा तयार झाली. भरपूर आर्थिक लाभ झाला, पण त्यानंतर त्यांनी निर्मिती आणि दिग्दर्शन केलेल्या झमेला, रंगिला (१९५४) वगैरे वगैरे चित्रपटांना रसिकांनी नाकारले. भगवानदादा यांची आर्थिक घसरण झाली. त्याचीही बरीच चर्चा होत असते. साठच्या दशकात अधेमधे रिपीट रनला 'अलबेला' प्रदर्शित होत असे.

सत्तरच्या दशकात १९७५ साली रणजीत बुधकर यांनी आपल्या चित्र खजिना या चित्रपट वितरण संस्थेच्या वतीने मुंबई वितरण विभागात 'अलबेला' पुन्हा प्रदर्शित केला. त्यांनी मुंबईतील रस्त्यांवर या चित्रपटाची पोस्टर्स मोठ्या प्रमाणावर लावली आणि कुठे मॅटीनी शो, कुठे नियमित तीन खेळ असा एकेक आठवड्यांसाठी हा चित्रपट प्रदर्शित करायचा व्यावसायिक दृष्टिकोन ठेवला आणि जवळपास पंचवीस वर्षांचा झालेला आणि आता पुढची पिढी वयात आली असताना यातील गाण्यांच्या लोकप्रियतेवर 'अलबेला' पुन्हा हाऊसफुल्ल गर्दीत चालू लागला. चित्रपटातील सुमधुर गाणी त्या चित्रपटाला सतत पुढील पिढीत नेत असते. भगवानदादा यांची नाचता नाचता खांदे उडवण्याची शैली भारी लोकप्रिय झाली. मला आठवतंय आमच्या गिरगावातील श्री गणेशोत्सव आणि अन्य सणांमध्ये गल्ली चित्रपटात 'अलबेला' दाखवत. चित्रपट पूर्ण झाल्यावर प्रोजेक्शनवर भोली सुरत दिल के खोटे चढवले जाई आणि पडद्यावर गाणे सुरू होताच पडद्यासमोर नाचायला सुरुवात होई. भारी मजा येई. रिपीट रनला या चित्रपटात भरभरून कमाई केली अशी चित्रपट क्षेत्रातील आर्थिक सत्ता असलेल्या नाझ चित्रपटगृह इमारतीत म्हटले जाई.

कालांतराने अलबेला चित्रपटाला साठ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त म्हणजे २०११ साली जुन्या पिढीतील चित्रपट रसिकांनी इंपिरियल चित्रपटगृहात या चित्रपटाच्या खास खेळाचे आयोजन केले आणि तो संपल्यावर जवळच्याच एका हॉलमध्ये मनसोक्त भेटीगाठी आणि जुन्या आठवणींना उजाळा देत देत गप्पा यांचे खास आयोजन केले. चित्रपटावरचे बेहद्द प्रेम म्हणतात ते हेच. याच प्रेमाने आपल्या देशात अगदी खालच्या माणसापर्यंत मनोरंजक चित्रपट पोहचला आणि त्याच मास अपिलने चित्रपट माध्यम आणि व्यवसाय जिवंत ठेवला.

निर्माते मोनिष बाबरे यांनी भगवानदादा यांच्या कार्यकर्तृत्वाचा वेध घेणारा शेखर सरताडेल दिग्दर्शित एक अलबेला (२०१६) या मराठी चित्रपटाची निर्मिती केली. या चित्रपटाची पटकथा शेखर सरताडेल आणि अमोल शेटगे यांची आहे. मंगेश देसाई यांनी भगवानदादा साकारण्यासाठी अतिशय मेहनत घेतली आणि त्या कर्तबगार व्यक्तिमत्वाला न्याय दिला. त्याला समिक्षक आणि रसिकांच्या सकारात्मक प्रतिक्रिया दिल्या. विद्या बालनने तेवढ्याच ताकदीने आणि उत्साहाने गीता बाली साकारली. विद्या बालन मराठी चित्रपटात भूमिका साकारणार ही ब्रेकिंग न्यूज गाजली. या दोघांनी 'अलबेला' मधील भोली सुरत दिल के खोटे, शाम ढले खिडकी तले वगैरे गाण्यात भगवानदादाची नृत्य शैली मस्त साकारली.

दिग्दर्शक अनुराग बासू यांनी आपल्या लुडो (२०२०) या चित्रपटात याच चित्रपटातील किस्मत की हवा कभी गरम कभी नरम या गाण्याचा अगदी कल्पकतेने वापर केला. श्रेयनामावली आणि क्लायमॅक्सला या गाण्याच्या ट्यूनचा वापर केला, चित्रपटात अधेमधेही ते वापरले. सुरुवातीला मूळ गाण्याचा छोटासा व्हिडिओही वापरला.

अलबेला चित्रपटाच्या पंचाहत्तर वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त एखाद्या भव्य दिव्य दिमाखदार पारितोषिक वितरण सोहळ्यात या चित्रपटातील गीत संगीत नृत्य साकारत दाद द्यायला हवी. काही वैशिष्ट्यपूर्ण कलाकृती कितीही जुन्या काळातील असल्या तरी कायमच आपल्या सोबत असतात. 'अलबेला' असाच आहे.





# सर्वांना आरोग्य सुविधेचा अधिकार





अलीकडेच एका प्रसिद्ध वृत्तपत्रात बातमी वाचली. राजस्थानमधील कोटा येथील १५ वर्षीय तन्वी परियानी २०१४पासून गंभीर हृदयरोगाने ग्रस्त होती. दिल्लीतील एम्स रुग्णालयात शस्त्रक्रियेपूर्वी १ सप्टेंबर रोजी तिचे निधन झाले. या १३ वर्षांच्या कालावधीत तन्वीच्या कुटुंबाचे लाखो रुपये खर्च झाले. भारत हा खेडेगावांनी वसलेला देश आहे, कारण मोठी लोकसंख्या ग्रामीण भागात राहते. त्यामुळे ग्रामीण भागात दररोज अनेक हृदयद्रावक घटना घडतात.

मध्य प्रदेशातील बालाघाटच्या आदिवासी भागात ३०हून अधिक मुलांच्या मृत्यूच्या बातमीने अस्वस्थ केले. अशा दुःखद घटनांमुळे आरोग्य सुविधा आणि प्रशासनावर प्रश्नचिन्ह निर्माण होत. अलीकडेच तेलंगणातील कोलामगुडा या ग्रामीण भागात सात महिन्यांची गर्भवती महिला गंभीर आजारी पडली. खराब रस्ता आणि कोणतीही सुविधा उपलब्ध नसल्यामुळे गावातील लोकांनी कामचलाऊ स्ट्रेचर तयार केले आणि उफाळून वाहणारी नदी पार करून त्या महिलेला प्राथमिक आरोग्य केंद्रापर्यंत पोहचवले. ग्रामीण भागात अशा अनेक घटना दररोज घडतात. वेळेवर उपचार न मिळाल्यामुळे दरवर्षी काही लोकांना आपला जीव गमवावा लागतो.

दरवर्षी १७ सप्टेंबर रोजी जगभरात रुग्णांना उत्तम आरोग्य सुविधा आणि सुरक्षितता मिळावी यासाठी जागतिक रुग्ण सुरक्षा दिन साजरा केला जातो. यावर्षी २०२६ची थीम "गैर-संसर्गजन्य रोगांसाठी सुरक्षित आरोग्यसेवा" अशी होता आणि त्याचा अधिकृत नारा "जीवनासाठी सुरक्षित आरोग्यसेवा" असा होता. भारतात रुग्णांच्या सुरक्षिततेसमोर आरोग्यसेवेच्या मूलभूत पायाभूत सुविधांवर असलेला अत्यधिक ताण, प्रशिक्षित कर्मचाऱ्यांची मोठी कमतरता, अत्याधुनिक संसाधनांचा अभाव आणि रुग्ण-आरोग्यसेवा प्रदाता यांच्यातील उच्च प्रमाण यांसारखी मोठी आव्हाने आहेत. आपल्या देशात लोकसंख्येच्या तुलनेत आरोग्य चिकित्सकांची मोठी कमतरता आहे. महानगरे आणि शहरांमध्ये पंचतारांकित हॉटेल्ससारखी नवीन खासगी रुग्णालये उघडली जात असून सरकार वैद्यकीय सेवा बळकट करण्यावरही भर देत असले, तरी झपाट्याने वाढणारे आजार देशाच्या लोकसंख्येवर आपली पकड वेगाने घट्ट करत आहेत. यामध्ये गरीब आणि मध्यमवर्गीय, विशेषतः ग्रामीण भागातील रुग्णांना संघर्ष करावा लागतो. रुग्णवाहिकेसाठी पैसे नसल्यामुळे आपल्या प्रियजनांचे मृतदेह खांद्यावर वाहून नेणाऱ्या कुटुंबियांना आपण अनेक वेळा पाहिले आहे.

सॅम्पल रजिस्ट्रेशन सिस्टम स्टॅटिस्टिकल रिपोर्टनुसार २०२४मध्ये झालेल्या एकूण मृत्यूंपैकी जवळपास निम्मे मृत्यू कोणत्याही प्रशिक्षित व्यावसायिकाच्या वैद्यकीय देखरेखीशिवाय झाले. २०२४मध्ये अशा मृत्यूंचे प्रमाण ४५.५ टक्के होते, जे २०२०मध्ये नोंदवलेल्या १८ टक्क्यांपेक्षा दुप्पटपेक्षाही अधिक आहे. २०२१पासून हे प्रमाण एकूण मृत्यूंच्या जवळपास निम्मे राहिले आहे. या श्रेणीत अशा लोकांचा समावेश होतो, ज्यांना मृत्यूच्या वेळी कोणतीही वैद्यकीय मदत मिळाली नाही किंवा ज्यांची काळजी केवळ अप्रशिक्षित व्यक्तीकडून घेण्यात आली. २०२४मध्ये प्रशिक्षित वैद्यकीय सेवेशिवाय झालेल्या मृत्यूंचे प्रमाण ग्रामीण भागात ४८.९ टक्के, तर शहरी भागात ३६.१ टक्के होते.

जागतिक आरोग्य संघटनेनुसार आरोग्यसेवा घेत असताना प्रत्येक १० रुग्णांपैकी जवळपास एका रुग्णाला हानी पोहचते आणि असुरक्षित आरोग्यसेवेमुळे दरवर्षी ३० लाखांहून अधिक मृत्यू होतात. कमी आणि मध्यम उत्पन्न असलेल्या देशांमध्ये असुरक्षित आरोग्यसेवेमुळे प्रत्येक १०० लोकांपैकी चार जणांचा मृत्यू होतो. ५० टक्क्यांहून अधिक हानी टाळता येऊ शकते. या हानीपैकी निम्मी हानी औषधांशी संबंधित समस्यांमुळे होते. काही अंदाजानुसार प्राथमिक आणि बाह्यरुग्ण आरोग्यसेवा व्यवस्थेत प्रत्येक १० रुग्णांपैकी चार रुग्णांना हानी पोहचते, तर यापैकी ८० टक्क्यांपर्यंत हानी टाळता येऊ शकते. उदाहरणार्थ औषधांशी संबंधित चुका, असुरक्षित शस्त्रक्रिया प्रक्रिया, आरोग्यसेवेशी संबंधित संसर्ग, तपासणी किंवा निदानातील चुका, प्रेशर अल्सर, रुग्णाची चुकीची ओळख, असुरक्षित रक्त संक्रमण आणि व्हेनस थ्रोम्बोएम्बोलिझम यांचा समावेश होतो. रुग्णाला होणाऱ्या हानीमुळे जागतिक आर्थिक विकासात घट होऊ शकते. जागतिक स्तरावर या हानीची अप्रत्यक्ष किंमत दरवर्षी ट्रिलियन अमेरिकी डॉलर इतकी असते.

हेल्थव्हॉइस - मेडिसर्कल मीडिया व्हेंचर जर्नलमध्ये प्रकाशित झालेल्या संशोधनानुसार जगातील सर्वात मोठ्या आणि सर्वाधिक गुंतागुंतीच्या आरोग्यसेवा व्यवस्थांपैकी एक असलेल्या भारतावर या समस्येचा मोठा भार आहे. १८व्या वार्षिक मेडिकोलीगल रिव्ह्यूनुसार केवळ २०२५मध्ये भारतात वैद्यकीय निष्काळजीपणाची ६५ हजार प्रकरणे नोंदवली गेली. अशा प्रकरणांमधून समोर येणारे धोके ही एक मोठी जागतिक समस्या दर्शवतात. जागतिक आरोग्य संघटनेचे म्हणणे आहे की, असुरक्षित वैद्यकीय सेवेमुळे दरवर्षी अंदाजे १३.८ कोटी रुग्णांना हानी पोहोचते.

आजकाल प्रत्येक क्षेत्रात बनावट उत्पादनांची भरमार आहे आणि औषध बाजारही त्याला अपवाद नाही. बनावट औषधांचे साम्राज्य वेगाने वाढत आहे. बनावट औषधांच्या नेटवर्कमध्ये आणि उत्पादनात वेगाने होत असलेल्या वाढीमुळे बनावट औषधे रोखण्यासाठीच्या पॅकेजिंगची जागतिक बाजारपेठ २०२६मध्ये १२९ अब्ज अमेरिकी डॉलरपर्यंत पोहचली आहे. रुग्णालयांमध्ये बनावट औषधांचा साठा आढळल्याच्या घटनाही घडल्या आहेत. एक काळ असा होता की, चिकित्सक हाताची नाडी, डोळे आणि जीभ पाहूनच आजाराचे निदान करत असत आणि क्वचितच तपासण्या करायचे, मात्र आज रुग्णालयात गेल्यानंतर बहुतांश वेळा प्रथम विविध तपासण्या लिहून दिल्या जातात आणि त्यानंतर अहवाल आल्यानंतर उपचार केले जातात. अनेक वेळा कोणती तपासणी कुठे करायची आणि औषधे कुठून घ्यायची, हेदेखील पूर्वीच ठरलेले असते. चिकित्सक सरकारी रुग्णालयांमध्ये सेवा देण्याऐवजी खासगी रुग्णालयांमध्ये काम करण्याला प्राधान्य देतात.

बहुतांश पाश्चिमात्य आणि विकसित देशांमध्ये चिकित्सकांना कठोर कायद्यांतर्गत पूर्ण प्रामाणिकपणे आणि कौशल्याने आरोग्य क्षेत्रात काम करावे लागते. रुग्णाच्या उपचारादरम्यान झालेल्या अगदी छोट्याशा चुकीसाठी किंवा निष्काळजीपणासाठीही चिकित्सकाला जबाबदार धरले जाते. त्यांचा परवाना जप्त केला जातो आणि शिक्षा केली जाते.

इतर क्षेत्रांप्रमाणेच आरोग्य क्षेत्रातही फसवणूक, भ्रष्टाचार, बनावटगिरी आणि अनैतिकतेच्या घटनांच्या बातम्या पाहायला आणि ऐकायला मिळतात. सोशल मीडियाच्या युगात तर या क्षेत्रातील व्हिडीओ दररोज व्हायरल होताना दिसतात, मात्र जगात हे एकमेव असे क्षेत्र आहे, जिथे चिकित्सकांना अमूल्य जीव वाचवणाऱ्या देवदूताचा दर्जा दिला जातो. प्रत्येक रुग्णाला उत्तम आरोग्य सुविधा अत्यंत सहजपणे मिळायला हव्यात. केवळ पैशांची कमतरता असल्यामुळे कोणत्याही व्यक्तीला आपला जीव गमवावा लागू नये. ग्रामीण, दुर्गम आणि मागासलेल्या भागांमध्येही आरोग्य सुविधांची पकड मजबूत असली पाहिजे. सर्वांना आरोग्य सुविधेचा अधिकार आहे, तर प्रत्येक व्यक्तीपर्यंत त्या सुविधेची पोहचही झाली पाहिजे.

**-प्रितम गेडाम**


# भाजपचे क्रियाशील प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण

भारतीय जनता पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष आमदार रवींद्र चव्हाण यांचा आज वाढदिवस. त्यांचा जन्म २० सप्टेंबर १९७० रोजी मुंबई येथे झाला. त्यांनी शालेय शिक्षण तेथूनच घेतले. पुढे बारावीचे शिक्षण पूर्ण केले आणि नंतरचे शिक्षण यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक येथून घेतले.

२००२मध्ये रवींद्र चव्हाण यांची भारतीय जनता युवा मोर्चाचे कल्याण उपविभाग अध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली. २००५मध्ये ते कल्याण-डोंबिवली महानगरपालिका येथे सदस्य म्हणून निवडून आले आणि डोंबिवली येथील सावरकर रोड वॉर्डचे त्यांनी प्रतिनिधित्व केले. २००७मध्ये ते कल्याण-डोंबिवली महापालिकेच्या स्थायी समितीचे अध्यक्ष झाले. २००९मध्ये भाजप युतीकडून डोंबिवली विधानसभा मतदारसंघाचे पहिले सदस्य म्हणून चव्हाण निवडून आले.

२०१९च्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत रवींद्र चव्हाण यांनी कोकण विभागात सर्वाधिक मते मिळवून विजय मिळवला. २०१६मध्ये त्यांची महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात राज्यमंत्री म्हणून नियुक्ती झाली. त्यांच्याकडे माहिती तंत्रज्ञान, वैद्यकीय शिक्षण, बंदरे, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण या खात्यांची जबाबदारी होती. १ फेब्रुवारी २०१८ रोजी त्यांची रायगड जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणून नियुक्त करण्यात आले.

भाजप-शिवसेना युती तुटल्यानंतर तसेच महाविकास आघाडी सरकार स्थापन झाल्यानंतर चव्हाण यांनी आमदार म्हणून कार्य सुरू ठेवले आणि जुलै २०२०मध्ये महाराष्ट्रातील भाजपचे सरचिटणीस म्हणून त्यांची नियुक्ती करण्यात आली. ११ जानेवारी २०२५ रोजी भाजप महाराष्ट्र प्रदेश कार्यकारी अध्यक्ष म्हणून त्यांची नियुक्ती करण्यात आली. त्यानंतर ते प्रदेशाध्यक्ष झाले.



दरम्यान, २०२२ ते २०२४ या काळात ते तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील महाराष्ट्र शासनात कॅबिनेट मंत्री होते. त्यांनी सार्वजनिक बांधकाम विभाग (सार्वजनिक उपक्रम वगळता) आणि अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांची जबाबदारी सांभाळली तसेच पालघर आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांचे पालकमंत्री म्हणूनही कार्य केले.

डोंबिवली मतदारसंघात आमदार रवींद्र चव्हाण यांनी अनेक उपक्रम राबवले आहेत. गुढीपाडवा शोभायात्रेत त्यांचा सहभाग असतो. त्यांनी नगरसेवक असल्यापासून देशभक्ती, समाज प्रबोधनाचे विषय मांडण्यास सुरुवात केली होती. २०१० साली त्यांनी डोंबिवलीकर पुरस्कार देण्यास सुरुवात केली. विविध क्षेत्रांत उत्तुंग कामगिरी करणाऱ्या डोंबिवलीकरांना हा पुरस्कार दिला जातो. मतदारसंघात रोझ फेस्टिव्हल, मुलांसाठी किलबिल महोत्सव, कला क्रीडा महोत्सव, डोंबिवली रेल परिषदेचे आयोजन, डोंबिवलीकर संगीत महोत्सव असे उपक्रम त्यांनी राबवले आहेत. आपल्या मतदारसंघावर चव्हाण यांची मजबूत पकड असल्याचे दिसते.

सार्वजनिक बांधकाममंत्री म्हणून प्रकल्प व्यवस्थापन माहिती प्रणाली रवींद्र चव्हाण यांनी सुरू केली. पारदर्शकता सुधारण्याची आणि प्रकल्प निरीक्षण सुव्यवस्थित करणे हे या प्रणालीचे उद्दिष्ट होते. कोकण रेल्वेच्या १२ स्थानकांसाठी सौंदर्यीकरण आणि पायाभूत सुविधांचा विकास करण्याचा प्रकल्प त्यांनी सुरू केला. हे काम एका वर्षात पूर्ण केले.

प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी दीर्घकाळ रखडलेल्या मुंबई-गोवा महामार्ग प्रकल्पातील समस्येवरही लक्ष दिले. त्यांच्या नेतृत्वाखाली जमिनीच्या अधिग्रहणाच्या समस्यांचा निपटारा करण्यात आला आणि कोकणमधील जमीन देणाऱ्या रहिवाशांना आर्थिक भरपाई देण्यात आली. अशा प्रकारे जोपर्यंत शेवटच्या घटकापर्यंत विकास व लाभ पोहचत नाही, तोपर्यंत कार्य करत राहण्याची शैली प्रदेशाध्यक्ष चव्हाण यांची आहे. शिवाय त्यांचा जनसंपर्कही दांडगा आहे. आपल्याला दिलेली प्रत्येक जबाबदारी ते झोकून देत पूर्ण करतात. आताही प्रदेशाध्यक्ष म्हणून त्यांचे कार्य अतिशय वाखाणण्याजोगे आहे. वाढदिवसानिमित्त त्यांना हार्दिक शुभेच्छा.

**(संकलन : टीम रामप्रहर)**

# आदिवासी बांधवांसोबत महापौरांचा गणेशोत्सव

◆ चिमुकल्यांसह महिलांचा सन्मान



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

खारघर येथील 'शिवनेरी' महापौर निवासस्थानी विराजमान झालेल्या श्री गणरायाची आरती चाफेवाडी व फणसवाडी येथील आदिवासी वाडीतील महिला, पुरुष तसेच चिमुकल्यांच्या हस्ते भक्तिभावपूर्ण वातावरणात संपन्न झाली. गणेशोत्सवाच्या पवित्र पर्वाचे औचित्य साधत समाजातील सर्व घटकांना उत्सवाच्या आनंदात सहभागी करून घेत सामाजिक बांधिलकी जपण्याचा कौतुकास्पद उपक्रम महापौर नितीन पाटील यांनी राबविला.

आरतीनंतर महापौर नितीन पाटील यांच्या हस्ते उपस्थित महिला भगिनींना साडी-चोळी, पुरुष बांधवांना पोशाख, तर चिमुकल्यांना नवीन कपडे देऊन सन्मानित करण्यात आले. सण-उत्सवाचा आनंद समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहचावा आणि त्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलावा या भावनेतून हा उपक्रम राबविण्यात आला.

यावेळी चाफेवाडी व फणसवाडी येथील क्रिकेट संघांनाही प्रोत्साहन देण्यात आले. स्थानिक युवकांमध्ये क्रीडाविषयक आवड वाढावी आणि त्यांना आवश्यक क्रीडा साहित्य उपलब्ध व्हावे यासाठी क्रिकेट संघांना बॅट, स्टम्प व बॉल खरेदी करण्यासाठी आर्थिक मदत देण्यात आली.

या मदतीमुळे स्थानिक युवा खेळाडूंमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. गणेशोत्सव हा श्रद्धा, भक्ती आणि आनंदाचा उत्सव आहे, मात्र या उत्सवाला सामाजिक बांधिलकीची जोड मिळाल्यास त्याचे महत्त्व अधिक अधोरेखित होते. समाजातील गरजू व वंचित घटकांना सोबत घेऊन त्यांच्या आनंदात सहभागी होणे, त्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलविणे आणि त्यांना सन्मानाची वागणूक देणे हीच खरी सामाजिक बांधिलकी आहे. गणरायाच्या साक्षीने आदिवासी बांधवांसोबत आनंदाचे क्षण साजरे करण्याची संधी, सामाजिक एकोपा, आपुलकी आणि माणुसकीचा संदेश देण्याचा प्रयत्न यानिमित्ताने महापौर नितीन पाटील यांनी केला आहे.

## खारघरमध्ये दंगा नियंत्रण पथकाची रंगीत तालीम

**पनवेल : वार्ताहर**



गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर कायदा-सुव्यवस्था आबाधित राखण्यासाठी खारघर पोलिसांनी तयारी सुरू केली आहे. खारघरमधील सेक्टर-११ येथील केंद्रीय विहार मेट्रो स्थानकासमोर दंगा नियंत्रण पथकाची रंगीत तालीम घेण्यात आली. खारघर शहराचा वाढता विस्तार, लोकसंख्येत होणारी वाढ तसेच घरगुती आणि सार्वजनिक गणेशोत्सवात वाढ झाल्याने उत्सव काळात मोठ्या प्रमाणात नागरिक रस्त्यावर येतात. गणेश विसर्जन मिरवणुका, गर्दीची ठिकाणे आणि संवेदनशील परिस्थितीत कायदा-सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिसांकडून विविध प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात येत आहेत.

त्याचाच एक भाग म्हणून दंगा नियंत्रण पथकातील अधिकारी व अंमलदारांना प्रतिकूल परिस्थितीचा सामना करण्यासाठी आवश्यक प्रशिक्षण देण्यात आले. या रंगीत तालमीमध्ये खारघर पोलीस ठाण्यातील एक पोलीस निरीक्षक, चार सहायक पोलीस निरीक्षक, पोलीस उपनिरीक्षक आणि ३२ पोलीस अंमलदार असे एकूण ३७ अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले होते. यावेळी दंगा नियंत्रण योजनेनुसार करण्यात येणाऱ्या विविध कवायतींचे प्रात्यक्षिक घेण्यात आले. पोलीस कर्मचारी महारुद्र देठे यांनी प्रशिक्षक म्हणून सहभागी अधिकारी व अंमलदारांना विविध कवायतींचे प्रशिक्षण दिले.

गर्दीवर नियंत्रण मिळवणे, प्रतिकूल परिस्थिती हाताळणे तसेच संभाव्य अनुचित प्रकारांना सामोरे जाताना घ्यावयाची दक्षता याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. गणेशोत्सव शांततेत आणि सुरक्षित वातावरणात पार पडावा तसेच आपत्कालीन परिस्थितीत पोलीस यंत्रणेने प्रभावीपणे प्रतिसाद द्यावा, यासाठी या सरावाचे आयोजन करण्यात आल्याचे खारघर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय जोशी यांनी सांगितले.

नागरिकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत संभाव्य परिस्थितीवर तातडीने नियंत्रण मिळवण्यासाठी पोलीस दलाची तयारी, समन्वय आणि प्रतिसादक्षमता तपासण्याच्या दृष्टीने ही रंगीत तालीम महत्त्वाची ठरली.



**पनवेल : भाजप नगरसेविका दमयंती निलेश भोईर यांना वाढदिवसानिमित्त भाजपचे महाराष्ट्र प्रदेश चिटणीस आमदार प्रशांत ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या. यावेळी त्यांच्या समवेत निलेश भोईर उपस्थित होते.**

## सजावटीच्या वादातून मुलाचा आईवर हातोड्याने हल्ला

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

मखर सजावटीचे साहित्य कुठे ठेवले या क्षुल्लक कारणावरून झालेल्या वादात मुलानेच वृद्ध आईच्या डोक्यात हातोडी मारून तिला गंभीर जखमी केल्याची घटना खालापूर तालुक्यातील नडोदे गावात घडली. याप्रकरणी वडिलांच्या तक्रारीवरून खालापूर पोलीस ठाण्यात मुलाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार तुषार येरुणकर याने त्याचे वडील तुळशिदास यांच्याकडे गणपतीच्या मखर सजावटीचे साहित्य कुठे ठेवले आहे, अशी विचारणा करत आरडाओरडा सुरू केला. त्यावेळी वडिलांनी यंदा छोटा मुलगा गणपती बसवत असून सजावटीची आवश्यक तयारी करण्यात आल्याचे सांगितले, मात्र या उत्तरावरून तुषारचा संताप वाढला आणि त्याने वडिलांसोबत वाद घालत त्यांना कानाखाली मारली. हा प्रकार पाहून वाद मिटवण्यासाठी मध्यस्थी करण्यासाठी गेलेल्या आईच्या कपाळावर तुषारने हातोडीने मारल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. या हल्ल्यात आई गंभीर जखमी झाली. घटनेनंतर परिसरात खळबळ उडाली असून वडिलांच्या तक्रारीवरून खालापूर पोलिसांनी तुषार येरुणकर याच्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास खालापूर पोलीस करीत आहेत.

## खारघरमध्ये लिफ्टमध्ये अडकलेल्या चिमुकल्याची सुटका

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

खारघर-तळोजा जेल रोड, सेक्टर १९, प्लॉट नंबर ८१ बी येथील खारघर रेजेन्सी आयकॉन सोसायटीत लिफ्टमध्ये लहान मुलगा अडकल्याची माहिती मिळाल्यानंतर खारघर अग्निशमन केंद्राचे जवान व फायर वाहन तत्काळ घटनास्थळी दाखल झाले. सोसायटीच्या २०व्या मजल्यावर लिफ्ट अडकून त्यात लहान मुलगा असल्याचे निदर्शनास आले.

जवानांनी लिफ्टच्या चावीने दरवाजा उघडण्याचा प्रयत्न केला, मात्र दरवाजा उघडला नाही. त्यामुळे दरवाजाच्या फटीतून मुलाला पाण्याची बाटली देऊन धीर दिला. अग्निशमन जवानांनी हायड्रोलिक स्प्रेडर, कटरच्या साहाय्याने लिफ्टचा दरवाजा उघडून मुलाला बाहेर काढले. मुलाच्या वडिलांनी अग्निशमन दलाच्या जवानांचे आभार मानले.

मुलाचे नाव कियान राहुल जग्यासी (५) असून तो त्याच सोसायटीच्या २०व्या मजल्यावर वास्तव्यास आहे. यावेळी सिडको अग्निशमन दल, खारघरचे प्रशांत दरेकर, अग्निशमन प्रणेता पी. आर. पाटील, फायरमन पी. सी. सोंडे, फायरमन सी. सी. पवार, यंत्रचालक पी. एस. निकाळे उपस्थित होते.



## रुग्णालयातून घरी गेल्यानंतर उपचारांसाठी मेडिकव्हरचा अनोखा होमवॉर्ड उपक्रम

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रुग्णालयातून डिस्चार्ज मिळाल्यानंतर पुढील उपचारांची आणि रुग्णाची काळजी घेण्याची जबाबदारी ही त्या रुग्णाच्या कुटुंबीयांवर येते. गंभीर आजारातून बरे होत असलेल्या रुग्णांसाठी औषधे, वैद्यकीय उपकरणे, रुग्णाच्या प्रकृतीची विशेष देखभाल किंवा विशेष रुग्णसेवेची गरज असल्यास ही जबाबदारी आणखी वाढते. अशा वेळी रुग्णालयातून घरी गेल्यानंतरची उपचार पद्धती अधिक सोपी आणि नियोजनबद्ध व्हावी यासाठी नवी मुंबईतील खारघरच्या मेडिकव्हर हॉस्पिटलने 'होमवॉर्ड' हा नवा उपक्रम सुरू केला आहे. भारतात पहिल्यांदाच अशा प्रकारचा उपक्रम रुग्णांसाठी राबविला जात आहे.





'होमवॉर्ड'अंतर्गत रुग्णालयातील डॉक्टर आणि ज्युपिटर इक्विपमेंट या वैद्यकीय उपकरणांच्या टीमच्या समन्वयातून रुग्णाच्या वैद्यकीय गरजेनुसार घरच्या घरी उपचारांची योजना तयार केली जाणार आहे. डिस्चार्जपूर्वी डॉक्टर रुग्णाची स्थिती आणि त्याला आवश्यक असलेल्या वैद्यकीय सुविधांचे मूल्यांकन करतील. त्यानुसार आवश्यक उपकरणे आणि घरगुती उपचारांची व्यवस्था केली जाईल. रुग्ण रुग्णालयातून घरी परतण्यापूर्वी शक्यतो एक दिवस आधीच घरात आवश्यक उपकरणे आणि इतर सुविधा उपलब्ध करून देण्याचे नियोजन करण्यात येणार आहे.

गंभीर आजारातून बरे होत असलेले तसेच ट्रॅकिओस्टॉमी म्हणजेच श्वसनमार्ग मोकळा करण्यासाठी घशाच्या पुढच्या बाजूला (श्वसननलिकेवर) शस्त्रक्रिया करून केलेले एक लहान छिद्र असून त्याची देखभाल किंवा विशेष वैद्यकीय उपकरणांची आवश्यकता असलेल्या रुग्णांसाठी हा उपक्रम फायदेशीर ठरणार आहे. रुग्णाची प्रकृती आणि डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार ही घरगुती देखभाल १५ ते ३० दिवसांपर्यंत सुरू ठेवता येणार आहे. यामध्ये डॉक्टरांनी सुचविलेली उपचार पद्धती, आवश्यक वैद्यकीय उपकरणे, विशेष प्रशिक्षित कर्मचाऱ्यांची मदत तसेच रुग्णालय, वैद्यकीय पथक, घरगुती उपचार करणारे कर्मचारी आणि कुटुंबीय यांच्यातील समन्वयाचा समावेश असेल. त्यामुळे रुग्णाला रुग्णालयातून घरी आल्यानंतरही उपचारांमध्ये सातत्य राखता येणार आहे.

मेडिकव्हर हॉस्पिटल्सचे महाराष्ट्र आणि कर्नाटक विभागाचे प्रादेशिक संचालक नीरज लाल म्हणाले की, डिस्चार्जनंतरचा काळ हा रुग्णाच्या बरे होण्याच्या प्रक्रियेतील महत्त्वाचा टप्पा आहे, मात्र रुग्णालयातून घरी गेल्यानंतर पुढील उपचार आणि काळजीबाबत रुग्ण व कुटुंबीयांमध्ये अनेकदा संभ्रम असतो. 'होमवॉर्ड'च्या माध्यमातून हा काळ अधिक नियोजनबद्ध आणि रुग्णकेंद्रित करण्याचा आमचा प्रयत्न आहे. रुग्णालयातील उपचारानंतरही योग्य वैद्यकीय मार्गदर्शन मिळत राहावे आणि रुग्णाचा पुनर्वसनाचा प्रवास अधिक सुरळीत व्हावा हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश आहे.

मेडिकव्हर हॉस्पिटल्स, नवी मुंबईचे सेंटर हेड संदीप जोशी म्हणाले की, रुग्ण रुग्णालयातून घरी गेल्यानंतर त्याची बरे होण्याची प्रक्रिया थांबत नाही. त्यानंतरचे काही दिवस पूर्णपणे बरे होण्यासाठी महत्त्वाचे असतात. या काळात रुग्ण आणि कुटुंबीयांना आवश्यक वैद्यकीय मदत आणि मार्गदर्शन मिळावे यासाठी 'होमवॉर्ड'ची रचना करण्यात आली आहे. त्यामुळे रुग्णाला हळूहळू आणि आत्मविश्वासाने त्याचे दैनंदिन आयुष्य पूर्ववत करण्यास मदत होईल.

सागर शशिकांत खोना (मुख्य कार्यकारी अधिकारी, ज्युपिटर इक्विपमेंट) सांगतात की, होमवॉर्डच्या माध्यमातून मेडिकव्हर हॉस्पिटल्ससोबत काम करताना आम्हाला खूप आनंद होतोय. रुग्णाला डिस्चार्ज मिळाल्यानंतर घरी होणाऱ्या पुढील उपचारांसाठी आधीपासून तयारी करणे किती महत्त्वाचे आहे हे या माध्यमातून अधोरेखित केले जाते. उपचार करणाऱ्या डॉक्टरांनी सांगितलेली आवश्यक वैद्यकीय उपकरणे रुग्णाला डिस्चार्ज मिळण्यापूर्वीच उपलब्ध करून दिल्याने रुग्ण घरी परतल्यापासूनच कुटुंबीयांना आवश्यक वैद्यकीय मदत आणि सुविधा योग्य वेळी मिळू शकतात. या सहकार्याचा उद्देश रुग्णालयातून घरी परतण्याची प्रक्रिया अधिक सुरळीत, नियोजनबद्ध आणि रुग्ण व त्यांच्या कुटुंबीयांसाठी अधिक दिलासादायक करणे हा आहे.








पनवेल : माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या शिवाजीनगर येथील निवासस्थानी विराजमान गणरायाचे लोकनेते स्व. दि.बा. पाटील यांचे पुत्र अतुल पाटील, नगरसेवक संतोष शेट्टी, श्वेता शेट्टी, नगरसेविका सीताताई पाटील, माजी उपसरपंच विजय घरत, माजी उपनगराध्यक्ष मदन कोळी, दीपक शिंदे, बाळासाहेब कारंडे, रवींद्र भोईर, जि. प. सदस्य आत्माराम भस्मा, सरपंच मंगेश शेलार, भाजप नेते कर्णा शेलार, पळस्पे विभागीय अध्यक्ष अनिश ढवळे, ग्रामपंचायत सदस्य सचिन वाघमारे, संतोष पवार, सी. एल. ठाकूर आदींनी दर्शन घेतले.



पनवेल : माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी भाजपचे ज्येष्ठ नेते जे.एम. म्हात्रे, माजी उपसरपंच विजय घरत आणि किशोर पाटील यांच्या कोपर येथील निवासस्थानी भेट देऊन तेथे विराजमान गणरायाचे दर्शन घेतले. माजी सभागृहनेते तथा नगरसेवक परेश ठाकूर यांनीही घरत कुटुंबीयांच्या बाप्पाचे दर्शन घेत सर्वांना गणेशोत्सवाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी जयवंत देशमुख, विक्रांत घरत, रामदास पाटील, वामन कोळी, जनार्दन घरत, अनिरुद्ध घरत, गणपत ठाकूर आदी उपस्थित होते.






पनवेल : गणेशोत्सवाच्या मंगलमय पर्वानिमित्त भाजपचे महाराष्ट्र प्रदेश चिटणीस आमदार प्रशांत ठाकूर यांनी पनवेल विधानसभा मतदारसंघातील विविध भागांना भेटी देत सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांसह घरगुती गणरायाचे दर्शन घेतले. त्यांच्या समवेत त्या त्या विभागातील पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित होते.




आदर्श सोसायटीचा राजा नवीन पनवेल, से. ७, वर्ष २८वे. सांस्कृतिक कार्यक्रमांचे अध्यक्ष भगवान ठाकूर व सहकारी तसेच आदर्श सोसायटीचे अध्यक्ष रमेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली हा गणेशोत्सव मोठ्या आनंदाने साजरा होतो.



विठ्ठल बेदुगडे, वाळण खुर्द, ता. महाड



संदीप आंग्रे, पनवेल



यतीन कोळी, उलवे, पनवेल



सुशिल ठाकूर, केळवणे, पनवेल






जयेश वत्सराज आणि
गणेश वत्सराज, देऊळवाडी, उरण



खारघर : पनवेल महापालिकेचे महापौर नितीन पाटील यांच्या खारघर येथील शासकीय निवासस्थानी विराजमान गणपतीचे डीएम फिल्म्स अँड आर्ट्सचे निर्माते व प्रसिद्ध व्यावसायिक दीपक मिरानी आणि कास्टिंग डायरेक्टर तथा भाजप सोशल मीडिया प्रकोष्ठ ओबीसी मोर्चा प्रदेश सदस्य प्रसाद हनुमंते यांनी दर्शन घेतले.



पनवेल : दिघाटी ग्रामपंचायतीच्या सरपंच रजनी ठाकूर आणि हिरामण ठाकूर यांच्या निवासस्थानी विराजमान गौरी गणपतीचे पंचायत समिती सभापती रंजना वास्कर आणि कुंडेवहाळ ग्रामपंचायतीचे माजी सरपंच सदाशिव वास्कर यांनी दर्शन घेतले.



दीप महाजन, पनवेल



अभंग परिवाराचा गणपती बाप्पा, नवीन पनवेल



आप्पा जाधव, खांदा कॉलनी, से. ९



खालापूर : भाजप उद्योग आघाडी जिल्हा संयोजक विठ्ठल मोरे यांच्या गणपती बाप्पा व गौरीचे विसर्जनापूर्वी माजी उपसभापती वत्सला मोरे, ग्रामपंचायत सदस्य यशोदा मोरे, सोशल मीडिया प्रमुख दीपक जगताप यांनी दर्शन घेतले.



लाड परिवार, खांदा कॉलनी



खालापूर : खोपोली नगर परिषदेचे उपनगराध्यक्ष विक्रम साबळे यांनी जिल्हा परिषद सदस्य नेहा भूषण पारंगे (रिस) यांच्या निवासस्थानी विराजमान गणरायाचे दर्शन घेतले.



पत्रकार विठ्ठल ममताबादे, कामठा, उरण



अनिल विष्णू राऊत, कोपरखैरणे, नवी मुंबई



जीवन पाटील व हरेश पाटील, सारडे, उरण



खोपोली नगरपालिका कार्यालय



विजय चंद्रकांत मोरे, सुर्ले मोर्बा, माणगाव

# पदापेक्षा कार्यकर्ता मोठा मानणारे कणखर नेतृत्व रवींद्र चव्हाण

संघटनेसाठी समर्पित भावनेने काम करणारे, कार्यकर्त्यांच्या सुख-दुःखात धावून जाणारे आणि पक्षाच्या विचारांना तळागाळापर्यंत पोहचवण्यासाठी सातत्याने प्रयत्न करणारे नेतृत्व म्हणजे आदरणीय भाजप प्रदेशाध्यक्ष आमदार रवींद्र चव्हाणसाहेब. राजकारणात पदे अनेकांना मिळतात, मात्र पदापेक्षा संघटना मोठी, संघटनेपेक्षा विचार मोठा आणि विचारांपेक्षा राष्ट्रहित सर्वोच्च मानून काम करणारी नेतृत्वशैली वेगळी ठरते. प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या राजकीय आणि संघटनात्मक प्रवासाकडे पाहताना ही बाब प्रकर्षाने जाणवते.



**कोकणात पक्षसंघटनेची पायाभरणी**

कोकणातील राजकीय परिस्थिती आणि संघटनात्मक आव्हाने लक्षात घेऊन गावागावात, मंडळा-मंडळात आणि बूथ पातळीवर पक्षाची उपस्थिती मजबूत करण्यासाठी प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी सातत्याने प्रयत्न केले. रायगड आणि कोकणाशी असलेल्या त्यांच्या दीर्घ संबंधांमुळे स्थानिक कार्यकर्त्यांशी त्यांचा थेट संपर्क निर्माण झाला.

२०१८मध्ये त्यांच्याकडे रायगडच्या पालकमंत्रिपदाची जबाबदारी आली. त्यानंतर कोकणातील संघटनात्मक कामावरही त्यांनी विशेष भर दिला. त्यांच्या या भूमिकेचा उल्लेख राजकीय विश्लेषणांमध्येही झाला आहे. पक्षाची ताकद केवळ मोठ्या नेत्यांच्या सभांमुळे वाढत नाही, तर गावातील सामान्य कार्यकर्ता, बूथप्रमुख, शक्तिकेंद्रप्रमुख, मंडळ पदाधिकारी आणि प्रत्येक कार्यकर्त्याच्या सातत्यपूर्ण मेहनतीमुळे संघटना उभी राहते हा विचार त्यांच्या कार्यपद्धतीत दिसून येतो.

**कार्यकर्ता हीच संघटनेची खरी ताकद**

रवींद्र चव्हाणसाहेबांच्या नेतृत्वातील सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे कार्यकर्त्यांशी असलेले त्यांचे नाते. कार्यकर्ता अडचणीत असताना त्याच्या पाठीशी उभे राहणे, त्याचे म्हणणे ऐकून घेणे, त्याला मानसिक बळ देणे आणि आवश्यक त्यावेळी मदतीचा हात देणे यातून कार्यकर्त्यांशी निर्माण झालेला विश्वास दिसून येतो.

मोठ्या पदावर पोहचल्यानंतरही सामान्य कार्यकर्त्यांशी सहजपणे संवाद साधणे, त्याच्यासोबत मनमोकळेपणाने बोलणे आणि त्याला आपलेपणाची जाणीव करून देणे ही प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या कार्यशैलीची विशेष बाब मानली जाते. त्यांच्यासाठी कार्यकर्ता हा केवळ पक्षाचा एक सदस्य नसून संघटनेचा आधारस्तंभ आहे. त्यामुळे कार्यकर्त्याला आदेश देण्यापेक्षा त्याच्याशी संवाद साधून त्याला सोबत घेऊन पुढे जाण्याची भूमिका त्यांच्या कामातून दिसते.

**संकटाच्या काळात प्रशासनाशी समन्वय**

रायगडचे पालकमंत्री म्हणून जबाबदारी सांभाळताना जिल्ह्यातील विविध नैसर्गिक आणि मानवनिर्मित संकटांच्या काळात प्रशासनाशी समन्वय साधण्याचे काम रवींद्र चव्हाण यांनी केले. एमआयडीसी परिसरातील अपघात, आगीच्या घटना, अतिवृष्टी, भूस्खलन किंवा इतर आपत्कालीन परिस्थिती असो संकटाच्या वेळी प्रशासनाने तातडीने प्रतिसाद देणे आणि मदतकार्याला गती मिळणे आवश्यक असते. आंबेनळी घाटासारख्या संवेदनशील भागातील दुर्घटनांमुळे या परिसरातील रस्ता सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. २०२६ मध्येही आंबेनळी घाटात गंभीर अपघात झाला असून त्यानंतर घाटमार्गाची सुरक्षितता आणि दरड कोसळण्याच्या घटनांवर प्रशासनाला उपाययोजना कराव्या लागल्या. अशा प्रसंगी लोकप्रतिनिधी, प्रशासन आणि स्थानिक यंत्रणा यांच्यातील समन्वय महत्त्वाचा ठरतो. संकटाच्या काळात परिस्थितीची दखल घेऊन मदतकार्याला चालना देण्याची भूमिका त्यांच्या राजकीय प्रवासातील महत्त्वाचा भाग राहिली आहे.

**संघटनात्मक विस्ताराला प्राधान्य**

रवींद्र चव्हाण यांचा प्रवास केवळ निवडणुकीपुरता मर्यादित राहिलेला नाही. पक्षाची सदस्यसंख्या वाढवणे, नवीन कार्यकर्त्यांना जोडणे, बूथपातळीवर संघटनात्मक रचना मजबूत करणे आणि पक्षाचा विचार समाजाच्या विविध स्तरांपर्यंत पोहचवणे या कामांवर त्यांनी भर दिला.

२०२४नंतर पक्षाच्या संघटनात्मक विस्ताराच्या अभियानाची जबाबदारीही त्यांच्याकडे देण्यात आली होती. त्यांच्या संघटनात्मक भूमिकेचा उल्लेख राष्ट्रीय पातळीवरील वृत्तांतही करण्यात आला आहे. यातून एक गोष्ट स्पष्ट होते निवडणुकीच्या काळातच नव्हे, तर इतरही वेळी संघटना मजबूत ठेवण्यावर त्यांचा भर राहिला आहे.

**विचारांशी निष्ठा आणि राष्ट्र प्रथम**

स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या विचारांचा वारसा आणि हिंदुत्वाच्या विचारांची ज्योत तळागाळापर्यंत पोहचवण्याच्या कार्यात रवींद्र चव्हाण यांनी सातत्याने सहभाग घेतला आहे, मात्र विचारधारा मांडताना व्यक्तीपेक्षा विचार आणि विचारांपेक्षा राष्ट्र मोठे हा संस्कार कार्यकर्त्यांमध्ये रुजवणे त्यांच्या मार्गदर्शनातील महत्त्वाची बाब आहे.

"व्यक्तीवर प्रेम करण्यापेक्षा देशावर प्रेम करा" हा संदेश कार्यकर्त्यांना देताना व्यक्तिनिष्ठ राजकारणापेक्षा राष्ट्रहित, देशसेवा आणि विचारांशी निष्ठा यांना महत्त्व देण्याचा आग्रह त्यांच्या कार्यपद्धतीत दिसतो. कार्यकर्त्याने एखाद्या व्यक्तीशी जोडले जाण्यापेक्षा विचारांशी जोडले गेले पाहिजे, संघटनेशी निष्ठा ठेवली पाहिजे आणि राष्ट्रहिताला सर्वोच्च स्थान दिले पाहिजे ही भूमिका संघटनात्मक नेतृत्वाला दीर्घकालीन दिशा देणारी ठरते.

**पदापेक्षा कार्यकर्त्यांशी नाते मोठे**

राजकारणात पद मिळते, पद जाते. जबाबदाऱ्या बदलतात, मात्र कार्यकर्त्यांच्या मनात निर्माण झालेला विश्वास टिकवणे ही खरी कसोटी असते. रवींद्र चव्हाणसाहेबांनी विविध जबाबदाऱ्या सांभाळताना संघटनेतील कार्यकर्त्यांशी संपर्क कायम ठेवण्यावर भर दिला. कार्यकर्त्यांच्या कार्यक्रमांना उपस्थित राहणे, स्थानिक प्रश्न समजून घेणे, त्यांच्या अडचणी ऐकून घेणे आणि संघटनेच्या कामासाठी त्यांना प्रोत्साहन देणे या माध्यमातून त्यांनी कार्यकर्त्यांशी जिव्हाळ्याचे नाते निर्माण केले. याच कारणामुळे त्यांच्यासोबत काम करणाऱ्या अनेक कार्यकर्त्यांना त्यांच्यात केवळ प्रदेशाध्यक्ष किंवा वरिष्ठ नेता नव्हे, तर मार्गदर्शक आणि आपला माणूस दिसतो.

दिवस असो वा रात्र, ऊन असो वा पाऊस संघटनेच्या कामासाठी मैदानात राहणे, कार्यकर्त्यांशी संपर्क ठेवणे आणि पक्षाचा विचार पुढे नेण्यासाठी सातत्याने प्रयत्न करणे ही त्यांच्या सार्वजनिक जीवनातील ठळक वैशिष्ट्ये म्हणून त्यांच्या समर्थकांकडून अधोरेखित केली जातात.

**मनापासून सलाम!**

आज पक्षसंघटनेचा विस्तार होत असताना त्यामागे असंख्य कार्यकर्त्यांचे कष्ट आहेत. त्या प्रत्येक कार्यकर्त्याला दिशा देणारे, त्याचा आत्मविश्वास वाढवणारे आणि संकटाच्या काळात त्याच्या पाठीशी उभे राहणारे नेतृत्व संघटनेसाठी महत्त्वाचे ठरते. रवींद्र चव्हाणसाहेबांच्या कार्यशैलीकडे पाहताना एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते नेतृत्व म्हणजे केवळ व्यासपीठावर उभे राहणे नाही; नेतृत्व म्हणजे कार्यकर्त्यांसोबत जमिनीवर उभे राहणे. कार्यकर्त्यांच्या सुख-दुःखात सहभागी होणे, त्यांच्या अडचणी समजून घेणे, संघटनेला गावागावात मजबूत करणे, विचारांशी निष्ठा ठेवणे आणि राष्ट्रहिताला सर्वोच्च स्थान देण्याचा संस्कार कार्यकर्त्यांमध्ये रुजवणे ही त्यांच्या नेतृत्वाची वैशिष्ट्ये आहेत.

अशा या संघटनेसाठी सदैव समर्पित, कार्यकर्त्यांना ऊर्जा देणाऱ्या, सामान्य कार्यकर्त्यांशी मैत्रीचे नाते जपणाऱ्या, संकटाच्या काळात त्याच्या पाठीशी उभे राहणाऱ्या आणि व्यक्तीपेक्षा विचार व राष्ट्रहित मोठे मानण्याचा संस्कार देणाऱ्या आदरणीय रवींद्र चव्हाणसाहेबांना मनःपूर्वक सलाम व वाढदिवसाच्या लाख लाख शुभेच्छा!

**-प्रकाश देसाई, ज्येष्ठ नेते, भाजप, रायगड**

**(शब्द संकलन : धम्मशील सावंत)**


20 SEP.
भारतीय जनता पार्टीचे
महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष
मा.श्री.
रवींद्रजी
चव्हाण
साहेब
आपणांस
वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा !
श्री. प्रकाश अर्जुनराव देसाई
पाली - रायगड
समस्त पदाधिकारी व कार्यकर्ते
भारतीय जनता पार्टी रायगड - सुधागड - पाली


20 SEP.
प्रदेशाध्यक्ष, भाजपा महाराष्ट्र
मा.श्री.
रवींद्रजी
चव्हाण
साहेब
आपणांस
वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा !
शुभेच्छुक
विक्रम
यशवंत साबळे
उपनगराध्यक्ष,
खोपोली नगरपरिषद,
भारतीय जनता पार्टी


प्रदेशाध्यक्ष, भाजपा महाराष्ट्र
मा.श्री.
रवींद्रजी
चव्हाण
साहेब
20 SEP.
आपणांस
वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा !
शुभेच्छुक
नितीन जयराम पाटील
महापौर-पनवेल महानगरपालिका
जिल्हा सरचिटणीस : भाजपा उत्तर रायगड
पनवेल विधानसभा प्रमुख भाजपा
संस्थापक-अध्यक्षः जाणीव एक सामाजिक संस्था